SPB
SHRI PISARNATH
BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३३६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१७ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मोठी बातमी, सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार नाराज?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, पुणे :** शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएसोबत जाणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरू लागली आहे. काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीच्या जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. दुसरीकडे सुनेत्रा पवारांच्या आमदारांमध्ये नाराजीचं वृत्त हाती आलं आहे. येत्या २२ जुलै रोजी दिवंगत अजित पवार यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी केली जाणार आहे. या जयंतीनिमित्त सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादीने आमदारांना महत्वाच्या सूचना दिल्याची माहिती समोर आली आहे. परंतु या सूचनेवरून आमदारांमध्ये नाराजीचा सूर असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.



दिवंगत नेते अजित पवार यांची सर्व शासकीय कार्यालयात केली जाणार आहे. कारण अजित पवार यांचा थोरपुरुष आणि थोर व्यतींच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. यासंदर्भात सामान्य प्रशासनाने १५ जुलै २०२६ जुलै रोजी अधिकृत परिपत्रक जारी केलं आहे. या जयंतीनिमित्त अजितदादांचा एकच प्रकारचा फोटो बॅनरवर लावण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. बॅनर लावल्यानंतर त्याचं जियो टॅगिंग करण्याचेही आदेश देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पक्षाच्या निर्णयावर अनेक आमदारांनी नाराजी व्यक्त केली आहे. यामुले पक्षातील नेत्यांचा आमदारांवर विश्वास नाही का, अशी चर्चा सुरू झाली आहे.

दिवंगत नेते अजित पवार यांची येत्या २२ जुलै रोजी शासकीय पातळीवर जयंती साजरी केली जाणार असल्याचे समोर आलं आहे. या जयंतीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून अनेक बैठका देखील घेण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी आमदारांना अजित पवारांची जयंती राज्यभर साजरी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जयंतीनिमित्त अनेक उपक्रम देखील घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु अजितदादांचे जयंतीनिमित्त एकाच प्रकारचे फोटो वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर बॅनरसहित जियो टॅगिंग करण्याचेही आदेश दिलेत. यावरून सुनेत्रा पवारांच्या आमदारांमध्ये नाराजी निर्माण झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या नाराजीमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधान आलं आहे.

# लासलगाव येथील ॲक्सिस बँक शाखेतून २५ लाखांची सायबर फसवणूक

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**




**दि.१६, लासलगाव (नाशिक) :** लासलगाव येथील ॲक्सिस बँकेच्या शाखेतील एका बँक खात्याचा वापर करून विविध तक्रारदारांची तब्बल २४ लाख ९० हजार रुपयांची सायबर फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संबंधित बँक खातेदाराविरोधात सायबर पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर पोलीस ठाणे (नाशिक ग्रामीण) येथे कार्यरत असलेल्या महिला पोलीस शिपाई मेघा निलेश कातकाडे (वय ३०, रा. सुदर्शन प्राईम, दत्तनगर, कोणार्क नगर-२, आडगाव, नाशिक) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे.

**अशी झाली फसवणूक :** २० जानेवारी २०२६ रोजी लासलगाव येथील ॲक्सिस बँकेच्या शाखेत संबंधित आरोपीने वेगवेगळ्या संदर्भ क्रमांकावरील (संदर्भ क्र. ३१९०४२६००७४४१४ व ३१६०२२६००२०७१४) तसेच इतर तक्रारदारांना विविध आमिषे दाखवून किंवा फसवून त्यांच्याकडील रक्कम स्वतःच्या ॲक्सिस बँकेच्या ९२५०२००५३७४८८०३ या खात्यात वळवून घेतली. त्यानंतर ती रक्कम स्वतःच्या अथवा इतर साथीदारांच्या आर्थिक फायद्यासाठी धनादेशाद्वारे (चेक) काढून घेतली. अशा प्रकारे एकूण २४ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

**विविध कलमान्वये गुन्हा दाखल :** या फसवणूक प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत, ॲक्सिस बँकेच्या संबंधित खातेदाराविरुद्ध १४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७.३१ वाजता सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**दाखल गुन्ह्याची सविस्तर माहिती :** पोलीस स्टेशन नोंद: स्टे.डा.नोंद क्र. ०४/२०२६, गुन्हा रजिस्टर नंबर: गु.र.नं. १५/२०२६

**लागू केलेली कलमे :** भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी) व ६६(डी).

या सायबर ठकबाजी प्रकरणाचा पुढील तपास नाशिक ग्रामीण सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागेश मोहिते हे करीत आहेत. या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा शोध पोलीस घेत आहेत.

# विठुरायाच्या चरणी ५६.५९ लाखांच्या सुवर्ण पादुका अर्पण!

## ४४६ ग्रॅम सोन्याच्या पादुकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची शोभा वाढली

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१६, पंढरपूर :** आषाढी यात्रेच्या पवित्र पर्वात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भक्ती, श्रद्धा आणि दानधर्माचा अनोखा संगम पाहायला मिळत आहे. लाखो वारकऱ्यांच्या जयघोषाने दुमदुमलेल्या श्रीक्षेत्र पंढरपुरात एका अज्ञात दानशूर भाविकाने तब्बल ५६ लाख ५९ हजार रुपयांच्या सोन्याच्या पादुका श्री विठ्ठलाच्या चरणी अर्पण करून भक्तिभावाचे अनोखे उदाहरण घालून दिले आहे.



मंदिर समितीच्या माहितीनुसार, दान करण्यात आलेल्या सोन्याच्या पादुकांचे वजन ४४६ ग्रॅम असून त्यांची अंदाजे किंमत रु. ५६,५९,००० इतकी आहे. संबंधित भाविकाने आपले नाव गोपनीय ठेवण्याची विनंती केली असून मंदिर समितीनेही त्यांच्या इच्छेचा मान राखला आहे. या दानामुळे आषाढी यात्रेतील सर्वात मोठ्या आणि लक्षवेधी दानांपैकी एक म्हणून या घटनेकडे पाहिले जात आहे.

सध्या आषाढी यात्रेनिमित्त राज्यासह देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात दाखल होत आहेत. दर्शनासोबतच अनेक भाविक रोख रक्कम, सोने, चांदी तसेच विविध मौल्यवान वस्तू दान स्वरूपात अर्पण करीत आहेत. या दानामुळे मंदिर समितीच्या धार्मिक व सामाजिक उपक्रमांनाही बळ मिळत आहे.

मंदिर समितीने सोने-चांदीच्या वस्तू स्वीकारण्यासाठी स्वतंत्र दान कक्ष सुरू केला असून तेथे दान केलेल्या प्रत्येक मौल्यवान वस्तूची शुद्धता तपासणे, वजन करणे, अधिकृत नोंदणी करणे आणि सुरक्षित स्वीकार करण्याची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविली जाते. यासाठी दोन अनुभवी सराफ आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी भाविकांना आवाहन केले की, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडे सोने, चांदी किंवा इतर मौल्यवान वस्तू दान करावयाच्या असल्यास त्या केवळ अधिकृत दान कक्षामध्ये जमा कराव्यात आणि त्याबदलची अधिकृत पावती अवश्य घ्यावी.

यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतलाताई नडगिरे, संभाजी शिंदे, ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रविणकुमार घम तसेच लेखाधिकारी मुकेश अनेचा उपस्थित होते.

आषाढी यात्रेच्या भक्तिमय वातावरणात विठुरायाच्या चरणी अर्पण झालेल्या या सुवर्ण पादुकांमुळे श्रद्धा, समर्पण आणि दानशूरतेचा एक प्रेरणादायी संदेश भाविकांपर्यंत पोहोचला असून, ही घटना यात्रेतील विशेष आकर्षण ठरली आहे.

# तळबीड पोलिसांची अवैध दारू विक्रीवर धडक कारवाई

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.१६, उंब्रज :** तळबीड पोलिसांनी बेलवडे गावच्या हद्दीत महामार्गालगत सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीवर धडक कारवाई करत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत देशी दारूचा साठा जप्त करण्यात आला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बेलवडे गावच्या हद्दीतील कंदील बार शेजारी महामार्गालगत पत्र्याच्या शेडच्या आडोशाला गौरव गजानन जाधव व शुभम विजय जाधव (दोघेही रा. बेलवडे हवेली) हे अवैधरित्या दारूची विक्री करत असल्याची गोपनीय माहिती तळबीड पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकून कारवाई केली.या कारवाईत आरोपींकडून १८० मिली क्षमतेच्या 'देशी संत्रा' ब्रँडच्या २१ दारूच्या बाटल्या, एकूण अंदाजे १ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी पोलीस अंमलदार सागर कोकरे यांच्या फिर्यादीवरून संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार योगेश भोसले करीत आहेत. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र भोरे, पोलीस उपनिरीक्षक खराडे, पोलीस शिपाई अभय मोरे, सागर कोकरे तसेच महिला पोलीस शिपाई पल्लवी मोहिते यांच्या पथकाने केली.

# आलीशान मोटारीतून विदेशी मद्याची तस्करी उधळली; ३३.६८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१६, पालघर :** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने पालघर जिल्ह्यात मोठी कारवाई करत आलीशान मोटारीतून होत असलेल्या विदेशी मद्याच्या अवैध वाहतुकीचा पर्दाफाश केला. या कारवाईत सुमारे ३३ लाख ६८ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.





राज्य उत्पादन शुल्क विभागाला १६ जुलै २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार गुजरातमधून पालघर जिल्ह्यात विदेशी मद्याची तस्करी होणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार निरीक्षक सुनील देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाने सापळा रचला.

कारवाईदरम्यान जव्हार-खाबळे रोडवरील विशाल ढाब्यासमोर (ता. जव्हार) तसेच रानाळा फाटा, वडवली (ता. जव्हार) येथे संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली. यावेळी मारुती सुझुकी बलेनो (GJ-03/BZ-8783) आणि फोर्ड एंडेव्हर (MH-43/X-1889) या वाहनांमधून महाराष्ट्रात विक्रीसाठी आणण्यात आलेले मोठ्या प्रमाणातील विदेशी मद्य जप्त करण्यात आले.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये ४५८ बॉक्स विदेशी मद्य (अंदाजे किंमत २४ लाख ६८ हजार ४८० रुपये), बलेनो कार (९ लाख रुपये) आणि फोर्ड एंडेव्हर (२० लाख रुपये) असा एकूण ३३ लाख ६८ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल समाविष्ट आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून संबंधित आरोपीविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सर्वदे, विभागीय उपायुक्त प्रदीप पवार, अधीक्षक गणेश बारगे आणि उपअधीक्षक अनिल राणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत निरीक्षक सुनील देशमुख, निरीक्षक अरुण चव्हाण, दुय्यम निरीक्षक रोशन एस. शेख, विश्वजित आप्पासो, विकास आवाळे, अभिजित मानकर, टी. डी. सावळकर तसेच भरारी पथकातील अधिकारी व जवानांनी सहभाग घेतला. या प्रकरणाचा पुढील तपास निरीक्षक सुनील देशमुख व निरीक्षक अरुण चव्हाण करीत आहेत.

# सुर्डीतील दीर्घकाळचा रस्त्याचा वाद अखेर मिटला

**अक्षराज : साहेबराव परबत**



**दि.१६, सुर्डी (सोलापूर) :** मौजे सुर्डी येथील गट क्रमांक ४२२/१, ४२३, ४२४ व ४२९ मधील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला वादग्रस्त रस्ता अखेर महसूल व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त कार्यवाहीतून खुला करण्यात आला. माननीय तहसीलदार एफ. आर. शेख (बार्शी) यांच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या या कारवाईमुळे वादी बबन साहेबराव शेळके, दीपक शंकर डोईफोडे तसेच प्रतिवादी सुखदेव वसुदेव शेळके या दोन्ही पक्षांना समान हक्काने रस्त्याचा वापर करता येणार असून दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या वादावर तोडगा निघाला आहे.

तहसीलदारांच्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी मंडळाधिकारी श्रीमती सारिका राऊत यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कार्यवाहीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त ठेवत मोलाचे सहकार्य केले.

या कारवाईत महसूल विभाग व पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचारी, महसूल सेवक दीपक दगडे तसेच पोलीस पाटील हरी खुणे उपस्थित होते. सर्व संबंधित विभागांच्या समन्वयामुळे संपूर्ण कार्यवाही शांततेत, कायदेशीर पद्धतीने आणि यशस्वीरित्या पार पडली.

या निर्णयामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा वाद संपुष्टात आला असून परिसरातील नागरिकांसाठी दळणवळणाचा महत्त्वाचा मार्ग पुन्हा खुला झाला आहे. प्रशासनाच्या तत्पर, पारदर्शक आणि समन्वयपूर्ण कार्यवाहीचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात येत असून, या निर्णयामुळे दोन्ही पक्षांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.




## जलसंधारण' प्रत्येकाचे कर्तव्य!

भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस होईल असा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी पाऊस उशिरा येईल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता तो खरा ठरला आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही मान्सून वेळेत दाखल झाला पण पुढे मान्सूनचा वेग मंदावला. मान्सूनचा वेग मंदावल्याने जून महिना कोरडाच गेला. जून महिना कोरडा गेल्याने शेतकऱ्यांसह सर्वांची चिंता वाढली. जून महिन्याप्रमाणे जुलै महिना कोरडा जाऊ नये अशी विनवणी शेतकऱ्यांसह सर्व नागरिकांनी वरुण राजाकडे केली. वरुण राजाने ही विनवणी मान्य केली असे म्हणावे लागेल. कारण जुलै महिन्याच्या पहिल्या दिवसापासून राज्यात पावसाने दमदार पुनरागमन केले. आता राज्यात सर्वत्र मान्सून पसरला असून पावसाने राज्यात सर्वदूर हजेरी लावली आहे. विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातील काही भागात दमदार पाऊस कोसळला. राज्यात दमदार पाऊस झाल्याने धरणातील पाणी साठाही वाढत आहे. राज्यातील सर्व नद्या, नाले, तलाव, ओढे ओसंडून वाहत आहेत. वरुण राजाने चांगली कृपा केल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. धरणीमाईही चिंब भिजून हिरवा शालू पांघरत आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात चांगला पाऊस झाला असला तरी आता पावसाने विश्रांती घेतली आहे. राज्यावर अल निनोचे संकट असल्याने पुन्हा असा दमदार पाऊस कधी होईल याचा नेम नाही. जर अल निनोचा प्रभाव कायम राहिला तर पुढे पावसाचे प्रमाण कमीच राहील असा हवामान खात्याचा अंदाज आहे. गेल्या काही वर्षात राज्यात अपुरा पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. पाण्यासाठी दाही दिशा.... अशी लोकांची अवस्था झाली होती. यावर्षीही पावसाचे प्रमाण कमी राहणार आहे असा अंदाज असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. यावर्षी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि वापर करावा लागणार आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडणार असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. पावसाच्या जास्तीतजास्त पाण्याची बचत कशी होईल याचे नियोजन आतापासूनच करावे लागणार आहे. जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे बरेचसे पाणी वाया जाते. कमी पाऊस पडणाऱ्या भागात तर हा पाण्याचा अपव्यय होय. महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचा विचार करता आपल्याकडे पाणी जिरवणे आणि पाणी साठवणे या दोन तंत्राची खूप जरुरी आहे. पाणी साठवण्यापेक्षा पाणी जिरवण्याचा फायदा असा की भूगर्भातील पाण्याचे बाष्पीभवन होत नाही व त्यात घट होत नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ धरणे बांधून, पाईपलाईन शहरापर्यंत नेऊन घरोघरी पाणी पोहचवणे असा नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ समाज व पाणी यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे. त्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व पटवून देणे. पावसाचे पाणी वाया जाऊ नये यासाठी पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे याचे शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला हवे. यासंदर्भात नागरिकांचेही प्रबोधन व्हायला हवे. नदी, विहीर, तलाव, बंधारे यात पावसाचे जास्तीतजास्त पाणी कसे साठेल याचे नियोजन सरकारी पातळीवर व्हायला हवे. नागरिकांनी आपल्या घरात, सोसायटीत रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयातही रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. पावसाच्या पाण्याची साठवणूक म्हणजे पर्जन्य जलसंधारण प्रत्येक घरात, सोसायटीत, कार्यालयात झाले पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पाण्याचा थेंब न थेंब महत्वाचा आहे. कारण पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे कारण ती काळाची गरज आहे. भविष्यात दुष्काळ पडू नये असे वाटत असेल तर पर्जन्य जलसंधारण करावेच लागेल.

**- श्याम ठाणेदार**

# नाव कमावणं कठीण, पण गमावणं क्षणाचं!




**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**

आयुष्यभर नाव कमावलं आणि म्हातारपणी गमावलं, अशी गत झाली ह्या माणसाची. हे वाक्य केवळ एका व्यक्तीच्या आयुष्याचं वर्णन नाही, तर सार्वजनिक जीवन जगणाऱ्या प्रत्येकासाठी एक गंभीर इशारा आहे. नेता, अधिकारी, साहित्यिक, कलाकार, समाजसेवक किंवा कोणतीही सार्वजनिक व्यक्ती असो, आयुष्यभराच्या कष्टाने निर्माण झालेली प्रतिमा, लोकांचा विश्वास आणि समाजाचा आदर एका चुकीच्या निर्णयामुळे क्षणार्धात कोसळू शकतो. प्रतिष्ठा उभारण्यासाठी अनेक दशके खर्ची पडतात, पण ती गमावण्यासाठी अनेकदा एकच चुकीचं पाऊल पुरेसं ठरतं. आज सामाजिक माध्यमांच्या युगात प्रत्येक व्यक्तीच न्यायाधीश झाली आहे. प्रत्येक कृतीचं विश्लेषण होतं, प्रत्येक विधानाचं परीक्षण होतं आणि प्रत्येक निर्णयावर लोकमत तयार होतं. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती अधिक जबाबदारीने करावी लागते. आयुष्यभर जपलेली विश्वासार्हता शेवटच्या टप्प्यावर मलीन होऊ नये, यासाठी विवेक, संयम आणि नैतिकता हेच सर्वात मोठे आधारस्तंभ ठरतात.

जीवनात यशस्वी होण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता किंवा प्रतिभा पुरेशी नसते, तर त्यासाठी चारित्र्याची साथही तितकीच आवश्यक असते. पैसा, पद, सत्ता किंवा प्रसिद्धी माणसाला मोठं करत नाहीत, त्याच्या निर्णयातील प्रामाणिकपणा, मूल्यांप्रती असलेली निष्ठा आणि समाजाविषयीची जबाबदारी त्याचं खरं मोठेपण सिद्ध करतात. म्हणूनच इतिहासात अनेक व्यक्ती त्यांच्या कर्तृत्वाइतक्याच त्यांच्या अखेरच्या चुकीमुळेही लक्षात राहिल्या आहेत. म्हातारपण हे अनुभव, शहाणपण आणि मार्गदर्शनाचं वय मानलं जातं. या वयात समाजाला दिशा देण्याची अपेक्षा असते. परंतु जर याच टप्प्यावर अहंकार, स्वार्थ, सत्तेची लालसा किंवा चुकीच्या लोकांची संगत माणसाला भरकटवत असेल, तर त्याने आयुष्यभर कमावलेली विश्वासार्हता एका क्षणात धुळीस मिळते. म्हणूनच म्हणतात, उतारवयातील संयम हा आयुष्यभराच्या कर्तृत्वाचा खरा रक्षक असतो.

आज अनेक क्षेत्रांत अशी उदाहरणे पाहायला मिळतात. काही राजकारणी आयुष्यभर जनतेसाठी काम करतात, पण शेवटच्या काळात सत्तेच्या मोहापायी तत्त्वांशी तडजोड करतात. काही अधिकारी प्रामाणिक सेवेनंतर निवृत्तीच्या उंबरठ्यावर भ्रष्टाचाराच्या आरोपात अडकतात. काही साहित्यिक किंवा समाजसुधारक स्वतःच्या विचारांशी विसंगत भूमिका घेतात आणि त्यांच्या चाहत्यांचाच विश्वास गमावतात. समाज त्यांच्या आयुष्यभराच्या योगदानाचा विसर पडू देत नाही, मात्र त्यांच्या शेवटच्या चुकीची सावली त्यांच्या संपूर्ण कर्तृत्वावर पडते. चुका होणं मानवी स्वभावाचा भाग आहे. मात्र चूक मान्य करण्याचं धैर्य आणि स्वतःमध्ये सुधारणा करण्याची तयारी हेच खऱ्या मोठेपणाचं लक्षण आहे. प्रतिष्ठा टिकवायची असेल तर सतत आत्मपरीक्षण आवश्यक आहे. स्वतःभोवती केवळ स्तुती करणारी माणसं गोळा करणारा व्यक्ती वास्तवापासून दूर जातो. टीका स्वीकारण्याची वृत्ती आणि आवश्यक तेव्हा नम्रपणे माघार घेण्याची तयारीच दीर्घकाळ सन्मान टिकवून ठेवते.

समाजानेही व्यक्तीचं मूल्यमापन करताना संतुलित भूमिका घ्यायला हवी. एका चुकीमुळे संपूर्ण आयुष्य नाकारण्याची घाई योग्य नाही. एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण योगदानाचा, परिस्थितीचा आणि भूमिकेचाही विचार व्हायला हवा. पण त्याचवेळी कोणतीही चूक केवळ व्यक्ती मोठी आहे म्हणून दुर्लक्षितही होता कामा नये. नैतिकतेचं माप




सर्वांसाठी समान असलं पाहिजे. आजच्या तरुण पिढीनेही या वास्तवातून महत्त्वाचा धडा घ्यायला हवा. करिअर, पैसा आणि प्रसिद्धी मिळवणं आवश्यक आहे; पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे विश्वास कमावणं. विश्वास हा बँकेतील ठेवीसारखा असतो, वर्षानुवर्षे जमा करावा लागतो पण एका चुकीच्या व्यवहाराने क्षणात संपतो. म्हणून प्रत्येक निर्णय घेताना त्याचा आपल्या प्रतिमेवर आणि भविष्यातील विश्वासावर काय परिणाम होईल, याचाही विचार व्हायला हवा.

सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी विशेषतः लक्षात ठेवावं की त्यांचं प्रत्येक पाऊल समाजासाठी संदेश ठरत असतं. त्यांची वाणी, वर्तन आणि निर्णय यावर अनेकांची श्रद्धा असते. त्यामुळे वैयक्तिक लाभापेक्षा सार्वजनिक विश्वास अधिक मौल्यवान असतो. एकदा हा विश्वास तुटला, तर कोणतंही पद, कोणतीही सत्ता किंवा कोणतीही संपत्ती त्या नुकसानीची भरपाई करू शकत नाही. माणसाचं खरं यश त्याने किती संपत्ती कमावली यावर ठरत नाही, तर त्याने किती चांगल्या आठवणी मागे ठेवल्या, किती स्वच्छ प्रतिमा निर्माण केली आणि किती माणसं आपल्या कर्तृत्वाने जोडली यावर ठरतं. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर लोकांनी हा माणूस शेवटपर्यंत तत्त्वांशी प्रामाणिक राहिला, असं म्हणणं हीच सर्वात मोठी कमाई असते.

आज समाजाला पदापेक्षा प्रामाणिकपणा, प्रसिद्धीपेक्षा विश्वास आणि यशापेक्षा चारित्र्य जपणारी माणसं हवी आहेत. कारण नाव कमावणं हे परिश्रमाचं फळ असतं, पण नाव टिकवणं ही आयुष्यभराची तपश्चर्या असते. प्रतिष्ठा हा मुकुट नसतो की हवा तसा घालता किंवा काढता येईल, ती आरशासारखी असते. एकदा तडा गेला की प्रतिबिंब कायमच बदलून जातं. काळ कोणालाही माफ करत नाही. तो प्रत्येकाच्या कर्तृत्वाची नोंद ठेवतो आणि प्रत्येक चुकीचाही हिशोब मांडतो. त्यामुळे आयुष्यभर जपलेली प्रतिमा शेवटच्या श्वासापर्यंत तितक्याच प्रामाणिकपणे जपावी लागते. इतिहास माणसाच्या संपत्तीची नव्हे, तर त्याच्या चारित्र्याची साक्ष देतो. सत्ता, संपत्ती आणि प्रसिद्धी क्षणभंगुर असतात, पण सचोटी, मूल्यनिष्ठा आणि समाजाच्या मनात निर्माण झालेला विश्वास हेच माणसाच्या आयुष्याचं खरं भांडवल असतं. आज प्रत्येक सार्वजनिक व्यक्तीने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे. आपण पदासाठी जगतो आहोत की प्रतिष्ठेसाठी? कारण पद निवृत्तीनंतर संपतं, पण प्रतिष्ठा पिढ्यान्पिढ्या जिवंत राहते. आयुष्याच्या संध्याकाळी मागे वळून पाहताना संपत्तीपेक्षा सन्मान, पदापेक्षा प्रतिष्ठा आणि लोकप्रियतेपेक्षा लोकांचा विश्वासच अधिक मौल्यवान वाटतो. म्हणून प्रत्येक कृती, प्रत्येक निर्णय आणि प्रत्येक शब्द हा आपल्या चारित्र्याचा आरसा असला पाहिजे. शेवटी एकच नाव कमावण्यासाठी आयुष्य खर्ची पडतं, पण नाव गमावण्यासाठी एक क्षण पुरेसा असतो. त्यामुळे कर्तृत्वापेक्षा चारित्र्य मोठं आणि प्रसिद्धीपेक्षा विश्वास अधिक मौल्यवान असतो. कारण इतिहास यशस्वी माणसांची नव्हे, तर विश्वासार्ह माणसांचीच कायम आठवण ठेवतो.

# मुंढे यांचा आदर्श..इतर अधिकाऱ्यांनी घ्यावा..?

आयएएस तुकाराम मुंढे हे नाव महाराष्ट्राच्या प्रशासनात प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता आणि निर्भीडपणाचं प्रतीक बनले आहे, पण सर्वसामान्य माणसांना असा प्रश्न पडतो की, ही प्रामाणिकपणाची जबाबदारी फक्त तुकाराम मुंढे यांनीच का घेतली आहे, देशभरात काही हजार आयएएस अधिकारी आहेत. त्यांचे काम मुंढे यांच्यासारखे उठून का दिसत नाही. तुकाराम मुंढे यांची वेळेअगोदर बदली करू नका, अशी लोक मोठ्या प्रमाणात मागणी करत असतात. अगदी रस्त्यावर उतरून आपल्या भावना व्यक्त करत असतात. समाज माध्यमांवर तर तुकाराम मुंढे यांचा जयजयकार होत असतो. लोक त्यांच्या कार्याची प्रचंड प्रशंसा करत असतात. इतरही अनेक आयएसआय अधिकारी आहेत, त्यापैकी काहींचा अपवाद वगळता तुकाराम मुंढे यांच्यासारखे लोकांचे प्रेम त्यांच्या नशीब का नाही? आयएएस ही देशातील अत्यंत कठीण परीक्षा मानली जाते. त्यात उत्तीर्ण होणे अतिशय आव्हानात्मक असते, कारण त्यासाठी अतिशय कठीण अशा बौद्धिक परीक्षेला आणि मुलाखतीला सामोरे जावे लागते. त्यामुळे अगदी अव्वल दर्जाचेच विद्यार्थी आयएसएस होत असतात. इतकी उच्च कोटीची बुद्धिमत्ता असलेल्या आयएसएस अधिकाऱ्यांकडून तितक्याच उच्च कोटीच्या कर्तव्यनिष्ठेची आणि प्रामाणिकपणाची अपेक्षा असते. तर मग ती अपेक्षा पूर्ण करताना तुकाराम मुंढे यांच्यासारखे अगदी हाताच्या बोटावर असणारे अधिकारीच का दिसतात. शासन, प्रशासन, न्यायव्यवस्था आणि पत्रकारिता हे लोकशाहीचे चार स्तंभ मानले जातात.सध्या देशात ५ हजार ७५५ आयएएस अधिकारी कार्यरत आहेत. प्रशासनामध्ये मोठी ताकद असते. राजकीय पक्षांची सरकारे बदलतात. मंत्रीही बदलत राहतात, पण आयएएस अधिकारी त्यांच्या निवृत्तीच्या कार्यकालापर्यंत विविध ठिकाणी आणि पदांवर कार्यरत राहतात.

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

### काय हे ?

सत्तेस्तव काहीपण
एक दुजात विलीन
कालपर्यंतभांडणारे
कौतुक वृंद तल्लीन

किती साफ सफाई
संबंध केवढे मलिन
नाती विस्कोटलेली
घराणी जरी कुलीन

सत्ता कुणांस नावडे
सिंहासनात शौकिन
नको म्हणतो खुर्ची
बसे कुणाचा यकीन

कुणी आंबटशौकिन
प्रिय वाटते नमकीन
सत्ता परी सर्वतोपरी
काहीइथेचं मुमकीन

कोल्ह्यांची कटू द्रांक्षे
बनवी झकास वाईन
असूद्या नासकीफळे
गोडमानून मी खाईन

ईडीची पेटवता बिडी
गुपचूप मारतात पीन
मिळकतीपेक्षा जादा
भरत राहिलो फाईन

विभक्त होत होताना
एकजूट मसुदे साईन
कोण उरले विरोधात
सगळेचंसत्तेत जॉईन

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

आजवर तुकाराम मुंढे यांची जिथे जिथे बदली झाली, तिथे तिथे व्यवस्थेला शिस्त लागली, फाईली वेळेत हलल्या, टेबलाखालचा व्यवहार बंद झाला आणि सामान्य माणसाला न्याय मिळाला. नवी मुंबई महापालिका असो, पुणे पीएमपीएमएल असो वा नाशिक महापालिका असो, मुंढे आले की भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकते, कामचुकार कर्मचारी वठणीवर येतात आणि जनतेचा व्यवस्थेवरचा विश्वास वाढतो. त्यांच्या कामाची पद्धत साधी



आहे. नियम पाळा, वेळेत या, लाच देऊ नका– घेऊ नका, आणि जनतेसाठी काम करा. यात कसलीही जादू नाही. मग प्रश्न असा पडतो की तुकाराम मुंढे जे करू शकतात, ते देशातले इतर हजारो आयएएस अधिकारी का करू शकत नाहीत ? जर प्रत्येक जिल्हाधिकारी, आयुक्त, सचिव यांनी मुंढे यांच्यासारखीच तळमळ आणि धाडस दाखवलं तर भारत खरेच अल्पावधीत बदलू शकतो. कल्पना करा, देशातल्या ७६६ जिल्ह्यांत जर प्रामाणिक आणि कार्यक्षम जिल्हाधिकारी असतील, प्रत्येक महापालिकेत मुंढे यांच्यासारखा आयुक्त असेल, तर रस्त्यांची कामे दर्जेदार होतील, सरकारी शाळेत शिक्षण सुधारेल, रुग्णालयात औषधे वेळेत मिळतील, रेशनच्या धान्याचा काळाबाजार थांबेल आणि भ्रष्टाचाराला आपोआप आळा बसेल. कारण व्यवस्था वरून सुधारते. आयएएस अधिकारी हा प्रशासनाचा कणा आहे. धोरणे कागदावर कितीही चांगली असली तरी ती राबवणारा अधिकारी जर हप्तेखोर किंवा मंत्र्यांचा 'होयबा' असेल तर त्या धोरणांचा कागद सडून जातो. आपल्या प्रशासकीय व्यवस्थेत हाता, प्रामाणिकपणाचे बक्षीस बदली आणि प्रामाणिकपणाची शिक्षा 'लूप लाईन पोस्टिंग' अशी झाली आहे. तुकाराम मुंढे यांच्याच ३० वर्षांच्या कारकिर्दीत २० पेक्षा जास्त बदल्या झाल्या. नियम मोडणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई केली की आमदार नाराज होतो, अवैध बांधकाम पाडलं की नगरसेवकाचा फोन मंत्र्याकडे जातो आणि मंत्री मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करतो. शेवटी बदली होते ती कायद्याने काम करणाऱ्या अधिकाऱ्याची. अशा वातावरणात अनेक हुशार आयएएस अधिकारीही हळूहळू 'सोयीचं' वागायला शिकतात.

त्यांना कळून चुकतं की टिकायचं असेल तर राजकीय वाऱ्याची दिशा ओळखून 'होय सर' म्हणणंच शहाणपणाचं. कारण संघर्ष करून स्वतःची कारकीर्द धोक्यात घालण्यापेक्षा, शांतपणे नोकरी करून, चांगली पोस्टिंग मिळवून, निवृत्तीनंतर राज्यपाल किंवा एखाद्या आयोगाचे अध्यक्ष होणं त्यांना जास्त सुरक्षित वाटतं. ही मानसिकता एका दिवसात तयार झालेली नाही. स्वातंत्र्यानंतर हळूहळू राजकारण्यांनी नोकरशाहीवर पकड घट्ट केली आणि नोकरशहांनीही राजकीय आश्रयात सुरक्षितता शोधली. 'तू माझं बघ, मी तुझं बघतो' या संस्कृतीने गुणवत्तेपेक्षा निष्ठेला महत्त्व आलं. त्यामुळे आज 'सरकारी बाबू' ही शिवी झाली आहे. पण याचा अर्थ सर्वच अधिकारी मिंधे आहेत असे नाही. के. एम. अब्राहम, अशोक खेमका, आर्मस्ट्राँग पामे, दुर्गा शक्ती नागपाल यांसारखी अनेक नावे आहेत ज्यांनी व्यवस्थेविरुद्ध लढून काम केले. समस्या ही आहे की अशा अधिकाऱ्यांना 'अपवाद' मानलं जातं. खरं तर प्रामाणिकपणा हा अपवाद नसून 'नियम' असायला हवा. आणि हा नियम बनवायचा असेल तर तीन गोष्टी कराव्या लागतील. पहिली गोष्ट, राजकीय हस्तक्षेप थांबवावा लागेल. अधिकाऱ्यांच्या बदल्या, पदोन्नती यासाठी स्वतंत्र 'सिव्हिल सर्व्हिसेस बोर्ड' सक्षम करावा लागेल. आज मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्याच्या पाठीशी सामान्य जनता उभी राहते, पण व्यवस्था उभी राहत नाही. नागरिकांनीही बदललं पाहिजे. आपली कामे करून घेण्यासाठी लाच द्यायची सवय सोडावी लागेल. जनता प्रामाणिक राहिली आणि प्रामाणिक अधिकाऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली, तर त्याची बदली करण्याची हिंमत नेते करणार नाहीत. कारण त्यांना जनतेतूनच निवडून यायचे असते. अन्न आणि औषधातील भेसळ यावरच मुंढेंनी घाव घातलेला आहे, गुन्हेगारांना जामीन मिळू न शकणारा मकोका लावला आहे, त्यामुळे प्रश्न असा पडतो की, यापूर्वीचे त्यांच्या जागेवरील आयएएस अधिकारी काय करत होते ?

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात बातम्या

## आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात ‘गुड टच, बॅड टच’ विषयावर दामिनी पथकाचे मार्गदर्शन



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**
**दि.१६, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील बभळाज येथील आर. सी.पटेल माध्यमिक विद्यालयात विद्यार्थिनींमध्ये सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यासाठी नुकतेच ‘गुड टच, बॅड टच’ (सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श) या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिरपूर पोलीस स्टेशनच्या 'दामिनी पथका'च्या हेडकॉन्स्टेबल पौर्णिमा पाटील यांनी विद्यार्थिनींना सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.एल. तवर हे उपस्थित होते.

सध्याच्या काळात शालेय विद्यार्थिनींची सुरक्षितता हा अत्यंत कळीचा मुद्दा बनला आहे. या पार्श्वभूमीवर हेडकॉन्स्टेबल पौर्णिमा पाटील यांनी विद्यार्थिनींशी अतिशय मनमोकळा संवाद साधला. त्यांनी 'गुड टच' आणि 'बॅड टच' यातील फरक विद्यार्थिनींना त्यांच्या वयाला साजेश्या सोप्या भाषेत समजावून सांगितला. एखादा अनुचित प्रसंग उद्भवल्यास किंवा कुणाचा स्पर्श चुकीचा वाटल्यास घाबरून न जाता, त्याची माहिती तत्काळ आपले पालक, शिक्षक किंवा पोलिसांना (दामिनी पथक) द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच स्वतःच्या संरक्षणासाठी विद्यार्थिनींनी नेहमी सतर्क आणि धाडसी असले पाहिजे, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एल. तवर यांनीही आपल्या अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थिनींना सुरक्षिततेचे महत्त्व पटवून दिले व दामिनी पथकाने राबवलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जे. एन. पाटील यांनी केले. तर उपस्थित मान्यवर आणि दामिनी पथकाचे आभार शीतल पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पाटण शहराच्या प्रभाग ६ मधील नाले सफाई रखडली, घाणीचे साम्राज्य



**अक्षराज : सुरेश संकपाळ**
**दि.१६, पाटण :** पाटण शहरात मान्सूनचे ढग दाटून येत असताना नगरपंचायत प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे प्रभाग क्रमांक ६ मधील नागरिकांच्या आरोग्यावर टांगती तलवार आहे. पावसाळ्यापूर्वी करणे बंधनकारक असलेली नाले सफाई अद्याप रखडलेली आहे. त्यामुळे गटारे तुंबून दुर्गंधी, डास आणि रोगराईचा धोका गंभीर झाला आहे. याच मुद्द्यावरून सामाजिक कार्यकर्ते नितीन पिसाळ यांनी आक्रमक भूमिका घेत नगरपंचायत प्रशासनाला थेट जाब विचारला आहे.

कर भरून घ्यायला नगरपंचायत पुढे, पण सुविधा द्यायला का मागे? पावसाळ्यात जर एखाद्या लहान मुलाला डेंग्यू झाला तर याला जबाबदार कोण. असा संताप सवाल नागरिकांनी केला नाल्यात प्लास्टिक, कचरा आणि गाळाने पूर्ण भरले आहेत.

- **परवा झालेल्या पावसातच रस्त्यावर घाण पाणी साचले होते.**
- **सांडपाणी रस्त्यावरून वाहत असल्याने शाळकरी मुलांना आणि महिलांना नाक दाबून जावे लागते.**
- **दुर्गंधीमुळे घरात बसणेही मुश्किल झाले आहे.**

प्रभाग ६ मधील नागरिकांनी घरपट्टी, पाणीपट्टी भरूनही त्यांना मूलभूत सुविधा का मिळत नाही?

उद्या मुसळधार पाऊस झाला आणि घरात गटाराचे पाणी शिरले तर नुकसान भरपाई नगरपंचायत देणार का?

हे प्रशासन फक्त आश्वासन देतं, काम करत नाही. मुख्याधिकारी भेटत नाहीत, कर्मचारी ‘वरून आदेश नाही’ म्हणतात. हा जनतेच्या आरोग्याशी केलेला खेळ आहे

- **डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया**
- **कावीळ, टायफॉईड, जुलाब**
- **त्वचारोग आणि लेप्टोस्पायरोसिस**

विशेषतः लहान मुले आणि वृद्ध यांना याचा सर्वात जास्त धोका आहे.

आता पावसाचे दिवस सुरू झाले आहेत. नगरपंचायत वेळीच जागी होऊन कारवाई करते की नागरिकांना आंदोलनाच्या मार्गाने जावे लागते, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते नितीन पिसाळ यांनी केला.

## डॉक्टरकडे ५० हजारांची खंडणी मागणारा सराईत गुन्हेगार जेरबंद; कोयता जप्त



**अक्षराज : प्राणिल कुसाळे**
**दि.१६, येरवडा (पुणे) :** परिसरातील एका डॉक्टरकडे ५० हजार रुपयांची खंडणी मागून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या सराईत गुन्हेगाराला लक्ष्मीनगर पोलिसांनी अटक केली आहे. अमोल जिवराज पिल्ले (वय ४६, रा. जय जवान नगर, येरवडा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध पुणे व कर्नाटकातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर स्वरूपाचे ५८ गुन्हे दाखल असून, यापूर्वी त्याच्यावर तडीपारीची कारवाईही करण्यात आली होती.

८ जुलै २०२६ रोजी आरोपीने जय जवान नगर येथील मथुरा हॉस्पिटलमध्ये जाऊन डॉ. सुभाष शंकरराव कोंकणे (वय ७५) यांना धमकावत ५० हजार रुपयांची खंडणी मागितली. या प्रकरणी ९ जुलै रोजी लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार राहुल परदेशी व अक्षय शिंदे यांना त्यांच्या गोपनीय बातमीदारामार्फत आरोपीची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून अमोल पिल्ले याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेला लोखंडी कोयता जप्त करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरवसे करीत आहेत.

# अंबिका देवस्थान, देविभोयरे ट्रस्टला ‘ब’ वर्ग दर्जा ; आ.दातेंच्या पाठपुराव्याला यश

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** देविभोयरे येथील ग्रामदैवत अंबिका देवस्थान ट्रस्टला अखेर शासनाकडून ‘ब’ वर्ग दर्जा प्राप्त झाला असून, या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे देवस्थानाच्या विकासासाठी नवे पर्व सुरू झाले आहे. यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी मंत्रालयीन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून शासनाची मंजुरी मिळवून दिली. या यशाबद्दल देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि भाविकांनी आमदार दाते यांचा जाहीर सत्कार करून मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

अंबिका देवस्थान हे देविभोयरेसह परिसरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असून, अनेक वर्षांपासून या देवस्थानाला ‘ब’ वर्ग दर्जा मिळावा, अशी ग्रामस्थांची सातत्यपूर्ण मागणी होती. हा दर्जा मिळाल्यामुळे देवस्थानाच्या प्रशासनात अधिक सुसूत्रता येणार असून, विकासकामांना गती मिळणार आहे. तसेच भाविकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याबरोबरच देवस्थानाच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनविषयक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे.

या मागणीचे गांभीर्य लक्षात घेत आमदार काशिनाथ दाते यांनी वेळोवेळी संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठका घेतल्या. मंत्रालयीन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, प्रशासकीय प्रक्रिया आणि मंजुरीचा प्रत्येक टप्पा स्वतः लक्ष घालून पूर्ण केला. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अखेर शासनाने देवस्थानाला ‘ब’ वर्ग दर्जा मंजूर केला.

यावेळी सत्काराला उत्तर देताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, देवस्थान ही केवळ पूजा-अर्चेची स्थळे नसून आपल्या संस्कृती, परंपरा आणि सामाजिक ऐक्याची केंद्रे आहेत. अंबिका देवस्थानाला ‘ब’ वर्ग दर्जा मिळणे हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून, संपूर्ण देविभोयरे आणि परिसरातील भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान आहे. या देवस्थानाच्या विकासासाठी भविष्यातही आवश्यक निधी, सुविधा आणि पायाभूत विकासकामांसाठी शासन स्तरावर सातत्याने प्रयत्न करत राहणार आहे. जनतेचा विश्वास आणि आशीर्वाद हीच माझ्या सार्वजनिक जीवनातील सर्वात मोठी ताकद आहे. मतदारसंघातील प्रत्येक गावाच्या विकासाबरोबरच धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपणे हीदेखील आपली सामूहिक जबाबदारी आहे.

यावेळी देवस्थान अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांच्यासह देविभोयरे व परिसरातील भाविक, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अंबिका देवस्थानाला ‘ब’ वर्ग दर्जा मिळावा ही आमच्या गावाची अनेक वर्षांपासूनची प्रलंबित मागणी होती. नवरात्रोत्सवाच्या काळात आमदार काशिनाथ दाते देविभोयरे येथे आले असताना आम्ही ही मागणी त्यांच्यासमोर मांडली. त्यावेळी दाते यांनी' हा विषय मार्गी लावल्याशिवाय शांत बसणार नाही,' अशी ग्वाही दिली होती. त्यानंतर त्यांनी मंत्रालयीन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून अखेर देवस्थानाला 'ब' वर्ग दर्जा मिळवून दिला. या यशाचे सर्वाधिक श्रेय आमदार काशिनाथ दाते सर यांनाच जाते.

**– शिवाजीराव जाधव**

# ‘दैनिक अक्षराज’ चा दणका !



## शाळा की छळछावणी? अखेर ‘त्या’ वादग्रस्त शिक्षकाची गच्छंती, शाळेतून कार्यमुक्त!

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१६, गंगापूर (छ.संभाजीनगर) :** वर्गात किरकोळ बडबड केल्याच्या कारणावरून इयत्ता नववीतील दोन निष्पाप विद्यार्थ्यांना हात फुटेपर्यंत आणि रक्तबंबाळ होईपर्यंत अमानुष मारहाण करणाऱ्या न्यू हायस्कूल, गंगापूर येथील वादग्रस्त शिक्षक ए. यु. साळुंखे यांच्यावर अखेर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. **'दैनिक अक्षराज' ने या संतापजनक घटनेला वाचा फोडल्यानंतर, संस्थेने शिक्षक साळुंखे यांची तडकाफडकी बदली केली असून,** १३ जुलै रोजी त्यांना शाळा प्रशासनातर्फे अधिकृतपणे कार्यमुक्त करण्यात आले आहे.

**नेमका काय आहे प्रकार?**

मिळालेल्या माहितीनुसार, ९ जुलै रोजी न्यू हायस्कूल गंगापूर येथे तास सुरू असताना वर्गात बोलल्याच्या कारणावरून शिक्षक ए. यु. साळुंखे यांचा पारा चढला. त्यांनी कसलाही विचार न करता नववीत शिकणारे विद्यार्थी भार्गव जोशी आणि समर्थ सोनवणे यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाणीची क्रूरता इतकी भयानक होती की, भार्गव जोशी याचे हात प्रचंड सुजले, तर समर्थ सोनवणे याचे हात रक्तबंबाळ होऊन त्याला गंभीर जखमा झाल्या.

**विद्यार्थ्यांना मानसिक धक्का; रुग्णालयात उपचार**

या अमानुष मारहाणीमुळे दोन्ही विद्यार्थ्यांना मोठा मानसिक व शारीरिक धक्का बसला आहे. मारहाण झाल्यापासून विद्यार्थी समर्थ सोनवणे याची प्रकृती खालावली असून त्याला सतत चक्कर येणे, शरीर आणि हात प्रचंड थरथरणे असा गंभीर शारीरिक त्रास सुरू झाला. घाबरलेल्या पालकांनी त्याला तातडीने गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. शिक्षकाच्या या हैवानियतीमुळे विद्यार्थ्यांच्या मनात शाळेबद्दल प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.

**पालकांचा आक्रमक पवित्रा आणि पोलीस तक्रार...**

या घटनेनंतर जखमी समर्थ याचे पालक प्रा. सुनील वाघमारे आणि भार्गव याचे पालक गणेश पुराणिक यांनी स्थानिक ग्रामस्थांसह तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेतली. शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळेत कोणत्याही विद्यार्थ्याला शारीरिक किंवा मानसिक त्रास देणे हा अजामीनपात्र गुन्हा ठरतो. त्यामुळे संतप्त पालकांनी व नागरिकांनी मुजोर शिक्षकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची आणि तात्काळ निलंबनाची मागणी केली होती.

**ग्रामस्थांचा रोष अन् प्रशासनाची पळापळ**

विद्यार्थ्यांना झालेल्या बेदम मारहाणीचे वृत्त **'दैनिक अक्षराज' मध्ये प्रसिद्ध होताच गंगापूर परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.** शाळा प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात गावकरी आणि पालकांमध्ये मोठा रोष निर्माण झाला होता. पालकांनी संबंधित शिक्षकावर गुन्हा दाखल करण्याची पूर्ण तयारी केली होती. मात्र, शाळा प्रशासनाने साळुंखे यांच्यावर तातडीने कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यामुळे पालकांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया तात्पुरती स्थगित ठेवली होती.

**मुख्यालयात रवानगी; नवीन शिक्षक रुजू**

स्थानिक ग्रामस्थांचा वाढता दबाव आणि जनक्षोभ लक्षात घेऊन शाळा प्रशासनाने अखेर १३ जुलै रोजी शिक्षक ए. यु. साळुंखे यांना शाळेतून अधिकृतपणे कार्यमुक्त केले. संस्थेकडून बदलीचा अंतिम आदेश प्राप्त होईपर्यंत त्यांना तात्पुरते संस्थेच्या मुख्य कार्यालयात (मुख्यालय) हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्यांच्या जागी नवीन बदली शिक्षक शाळेत रुजू झाले असल्याची माहिती शाळा प्रशासनाने दिली आहे.

**पालकांचे समाधान, पण कडक कायद्याची मागणी**

'दैनिक अक्षराज' च्या वृत्तांतर झालेल्या या कारवाईमुळे पालकांनी तात्पुरते समाधान व्यक्त केले असले, तरी अशा हिंसक शिक्षकांमुळे संस्था बदनाम होतात. भविष्यात कोणत्याही विद्यालयात अशा प्रकारची छळछावणी सुरू होऊ नये आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची हमी मिळावी, अशी ठाम मागणी गंगापूरमधील संतप्त पालक व नागरिकांनी केली आहे.



दैनिक संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
मुख्य संपादक : विनोद गोरे मोबा.८६०५३१३२०२

**शाळा की छळछावणी?**
**गंगापूरच्या ‘न्यू हायस्कूल’मध्ये शिक्षकाचा थरार**

अक्षराज : प्रतिनिधी
दि.०९, गंगापूर (छ.संभाजीनगर) : गंगापूर शहरातून आज एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. येथील 'न्यू हायस्कूल'मध्ये केवळ वर्गात बडबड केल्याच्या किरकोळ कारणावरून इयत्ता नववीच्या दोन निष्पाप विद्यार्थ्यांना शिक्षकाने हात फुटेपर्यंत आणि रक्तबंबाळ होईपर्यंत अमानुषपणे मारल्याचा खळबळजनक प्रकार आज, गुरुवार दिनांक ९ जुलै २०२६ रोजी घडला. या घटनेमुळे संपूर्ण शहरात पालकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून शिक्षण क्षेत्रावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

नेमका काय आहे प्रकार?
मिळालेल्या माहितीनुसार, आज शाळेत तास सुरू असताना वर्गात बोलल्याच्या कारणावरून संबंधित शिक्षकाचा पारा चढला. शिक्षकाने कसलाही विचार न करता इयत्ता नववीत शिकणारे विद्यार्थी भार्गव जोशी आणि समर्थ सोनवणे यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाणीचा वेग आणि क्रूरता इतकी भयानक होती की, दोन्ही विद्यार्थ्यांचे हात सुजले, त्यांना गंभीर जखमा झाल्या आणि हातांमधून थेट रक्तस्राव सुरू झाला.

विद्यार्थ्याला मानसिक धक्का;
हात थरथरू लागल्याने रुग्णालयात दाखल
या अमानुष मारहाणीचा भार्गव आणि समर्थ या दोन्ही विद्यार्थ्यांना मोठा मानसिक व शारीरिक धक्का बसला आहे. यापैकी समर्थ सोनवणे या विद्यार्थ्याची प्रकृती मारहाण झाल्यापासून अत्यंत खालावली आहे. त्याला सतत चक्कर येणे, शरीर आणि हात प्रचंड थरथरणे असा गंभीर शारीरिक त्रास सुरू झाला. घाबरलेल्या पालकांनी त्याला तातडीने गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेले. शिक्षकाच्या या हैवानियतमुळे विद्यार्थ्यांच्या मनात शाळेबद्दल प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.

पालकाची पोलिस ठाण्यात धाव
पालकांनी आणि संतप्त नागरिकांनी या मुजोर शिक्षकावर तात्काळ निलंबनाची आणि फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.
शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन : कायद्यानुसार शाळेत कोणत्याही विद्यार्थ्याला शारीरिक किंवा मानसिक त्रास देणे हा अजामीनपात्र गुन्हा ठरतो. असे असतानाही विद्यार्थ्यांचे हात रक्तबंबाळ करेपर्यंत मारणाऱ्या शिक्षकावर शिक्षण विभाग काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.
दरम्यान, या खळबळजनक घटनेनंतर न्यू हायस्कूल प्रशासन आणि संबंधित शिक्षकाची बाजू अद्याप समोर आलेली नाही. मात्र, या घटनेने गंगापूरमधील शैक्षणिक वर्तुळ हादरले असून दोषी शिक्षकाला पाठीशी न घालता कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

केवळ वर्गात बोलले म्हणून मुलांना रक्त निघेपर्यंत मारणे ही क्रूरता आहे. अशा शिक्षकांमुळे संस्था बदनाम होतात.शिक्षण विभागाने तातडीने दखल घेऊन या शिक्षकावर कडक कारवाई करावी,
– संतापलेले पालक व नागरिक, गंगापूर.

Jitendra Lingayat

# नामांकित दूध कंपन्यांच्या पिशव्यांत पाण्याची भेसळ, गोरेगावात दोघांना अटक

**अक्षराज : सुनिल साखरकर**
**दि.१६, मुंबई :** गोरेगाव पश्चिम परिसरात नामांकित दूध कंपन्यांच्या दुधाच्या पिशव्यांमध्ये अस्वच्छ पाणी मिसळून भेसळयुक्त दूध विक्रीसाठी तयार करणाऱ्या दोघांना मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष-११ ने अटक केली. या कारवाईत ३९ हजार ५०४ रुपये किमतीचे ५५८ लिटर भेसळयुक्त दूध तसेच भेसळीसाठी वापरण्यात आलेले साहित्य जप्त करून नष्ट करण्यात आले.

गुन्हे शाखेच्या कक्ष-११ ला गोरेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रेमनगर, तीन डोंगरी परिसरातील अंकुर बिल्डिंग जवळील सिद्धिविनायक सेवा मंडळ सोसायटीमध्ये अमूल गोल्ड, अमूल ताजा आणि गोकुळ या नामांकित कंपन्यांच्या दुधाच्या पिशव्यांमध्ये अस्वच्छ पाणी मिसळून ते विक्रीसाठी तयार केले जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे १५ जुलै रोजी पहाटे अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न सुरक्षा अधिकारी जयकुमार प्रदीप पाटील यांच्या उपस्थितीत गुन्हे शाखेच्या पथकाने रूम क्रमांक १२ आणि ३०६ येथे छापा टाकला. छाप्यावेळी आरोपी दुधाच्या मूळ पिशव्या कापून त्यातील काही प्रमाणात दूध बाहेर काढत होते.



त्यानंतर त्या पिशव्यांमध्ये मानवी आरोग्यास अपायकारक ठरू शकणारे अस्वच्छ पाणी भरून स्टोव्ह पिन आणि मेणबत्तीच्या सहाय्याने पिशव्या पुन्हा सील केल्या जात असल्याचे उघड झाले. त्यानंतर हे दूध नामांकित कंपन्यांचे शुद्ध दूध असल्याचा भास निर्माण करून ग्राहकांना विक्रीसाठी पाठविण्याची तयारी सुरू होती.

कारवाई दरम्यान ५५८ लिटर भेसळयुक्त दूध आणि भेसळीसाठी वापरण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जप्त केलेले दूध नष्ट करण्यात आले असून आरोपींविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दादासाहेब बनसोडे करीत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सहआयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्णकांत उपाध्याय, पोलीस उपआयुक्त (प्रकटीकरण-१) नवनाथ ढवळे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त रविंद्र अडाणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-११ च्या पथकाने अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने पार पाडली.

# एक्को पॉईंट येथील सार्वजनिक स्वच्छतागृह अखेर दुरुस्त पर्यटकांना मोठा दिलासा

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१६, माथेरान :** माथेरानमधील प्रमुख पर्यटनस्थळ असलेल्या एको (एलहे) पॉईंट येथील अनेक दिवसांपासून बंद असलेले सार्वजनिक स्वच्छतागृह अखेर दुरुस्त करून पुन्हा सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे विशेषतः महिला पर्यटकांसह हजारो पर्यटकांना मोठा दिलासा मिळाला आहे.स्वच्छतागृह बंद असल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून पर्यटकांची मोठी गैरसोय होत होती. आठवड्याच्या शेवटी वाढणाऱ्या गर्दीत महिलांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत असल्याने स्थानिक नागरिकांनी तसेच सोशल मीडियावरून वारंवार ही समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. या पार्श्वभूमीवर प्रभाग



क्रमांक २ च्या नगरसेविका लता ढेबे यांनी तातडीने पाठपुरावा करून नवीन पाण्याची टाकी बसविण्यात येईपर्यंत जुन्या टाकीला थेट पाईपलाईन जोडण्याची व्यवस्था केली. पाणीपुरवठा सुरू होताच स्वच्छतागृह कार्यान्वित करण्यात आले असून, नवीन टाकी बसविल्यानंतर कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

दरम्यान, गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शार्लोट लेककडे जाणाऱ्या रस्त्याच्या काही भागाची मोठ्या प्रमाणात धूप होऊन रस्ता वाहून गेला आहे. याची नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, नगरसेवक सिद्धाराम कुंभार आणि नगरसेविका लता ढेबे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने दुरुस्तीच्या सूचना दिल्या आहेत.

पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ठिकाणी मातीचे बंधारे उभारण्याचे काम सुरू करण्यात आले असून, परिसरातील कचरा उचलणे, स्वच्छता राखणे आणि पर्यटनस्थळ स्वच्छ ठेवण्यासाठी विशेष मोहीमही राबविण्यात येत आहे.पर्यटकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत स्वच्छतागृहे, पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, स्वच्छता आणि पर्यटनस्थळांच्या देखभालीसाठी प्रभाग क्रमांक २ च्या नगरसेविका लता ढेबे सातत्याने पाठपुरावा करत असून, प्रशासनाशी समन्वय साधून विविध विकासकामे मार्गी लावत आहेत.

# सहाय्यक पोलीस निरीक्षक कोते यांनी स्वीकारला लासलगाव पोलीस ठाण्याचा पदभार

## गुन्हेगारीवर वचक निर्माण करणार; नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचा निर्धार

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, लासलगाव (नाशिक) :** येथील पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर सागर कोते यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. एक कर्तव्यदक्ष आणि कार्यतत्पर अधिकारी म्हणून ओळख असलेले कोते यांनी यापूर्वी येवला व वावी येथे उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या बदलीने लासलगाव पोलीस ठाण्याला नवा कारभारी मिळाला असून, परिसरातील गुन्हेगारीवर वचक निर्माण होण्याची मोठी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते



यांनी यापूर्वी येवला आणि वावी पोलीस स्टेशनमध्ये अत्यंत प्रभावीपणे काम केले आहे. तेथील कायदा व सुव्यवस्था चोख राखण्यासोबतच अनेक क्लिष्ट गुन्ह्यांची उकल करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या या दांडग्या अनुभवाचा फायदा लासलगाव आणि परिसरातील शांतता, सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी होणार आहे.

### रुजू होताच घेतला आढावा

पदभार स्वीकारल्यानंतर कोते यांनी तातडीने पोलीस ठाण्यातील सहकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी लासलगाव परिसराची भौगोलिक परिस्थिती आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीचा सविस्तर आढावा घेतला.लासलगाव आणि परिसरातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट राहील. कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. असे सागर कोते यांनी आपले मत व्यक्त केले.

### विविध स्तरातून स्वागत

कोते यांनी पदभार स्वीकारल्यानंतर लासलगाव परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच पोलीस प्रशासनातील सहकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे उत्साहात स्वागत केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नव्या अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे लासलगाव परिसरातून समाधान व्यक्त होत आहे.

# मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वसामान्यांपर्यंत शिबिराचा लाभ पोहोचेल, असे प्रभावी नियोजन करा - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. समाजातील प्रत्येक नागरिकाला वेळेत आरोग्य सेवा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य शिबिरांचा लाभ प्रत्येक सर्वसामान्य नागरिकापर्यंत पोहोचेल,यासाठी प्रशासनाने प्रभावी नियोजन करावे,अशा सूचना आ.किशोर जोरगेवार यांनी प्रशासनाला दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या'देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह'अंतर्गत मुख्यमंत्री सहायता निधी,धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष,जिल्हा प्रशासन चंद्रपूर तसेच भारतीय जनता पक्ष,चंद्रपूर विधानसभा क्षेत्र यांच्या संयुक्त विद्यमाने नागरिकांसाठी भव्य मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी वन विभागाच्या विश्राम गृहात नियोजन बैठक पार पडली.

यावेळी मनपा आयुक्त नरेश अकुनुरी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.मिलिंद कांबळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.बंडू रामटेके, सहायक आयुक्त शुभांगी सूर्यवंशी, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. नैना उत्तरवार, मुख्यमंत्री सहायता निधी विभाग तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. तसेच भारतीय जनता पक्षाचे माजी महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री सविता दंढारे, दशरथसिंह ठाकूर, बलराम डोडाणी, तुषार सोम, अजय जयस्वाल, प्रकाश देवतळे, मनपा गटनेते शेखर शेट्टी, नगरसेविका सविता कांबळे, आशा देशमुख, सरला कुळसंगे, सतीश तायडे, चंद्रशेखर देशमुख आदी उपस्थित होते. बैठकीत १९ जुलै २०२६ रोजी मुल रोडवरील भवानजीभाई चव्हाण हायस्कूल येथे आयोजित करण्यात येणाऱ्या महाआरोग्य



शिबिराच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या शिबिरामध्ये जनरल मेडिसिन, जनरल सर्जरी, अस्थिरोग, बालरोग, हृदयरोग, स्त्रीरोग, कर्करोग,नाक-कान-घसा, नेत्ररोग, त्वचारोग, दंतरोग, मूत्रपिंड विकार, मानसिक आरोग्य, फिजिओथेरपी आदी विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे. तसेच आवश्यकतेनुसार विविध मोफत वैद्यकीय तपासण्या, मुख्यमंत्री सहायता निधी व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेबाबत मार्गदर्शन तसेच उपचारासाठी आवश्यक सहकार्य ही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते आणि संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देत शिबिराचा लाभ चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश दिले.

हा सेवा सप्ताह समाजहिताला समर्पित असून गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांनी या मोफत महाआरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा,असे आवाहन ही यावेळी करण्यात आले.

# जिल्हाधिकारी एस.कार्तीकेयन यांची पालखी मार्ग व तळांची पाहणी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१६, पंढरपूर :** आषाढी यात्रा २०२६ च्या पार्श्वभूमीवर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा १९ जुलै व जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळा २० जुलै रोजी सोलापूर जिल्ह्यात दाखल होणार असल्याने जिल्हा प्रशासनाने तयारीला अंतिम वेग दिला आहे.

या अनुषंगाने जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी गुरुवारी पालखी मार्ग, पालखी तळ आणि मुक्कामाच्या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

लाखो वारकरी भाविकांच्या सोयीसाठी शासनाने पालखी तळांच्या विकासासाठी व पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. पालखी मार्गावर तसेच मुक्कामाच्या ठिकाणी पाणी, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, रस्ते व इतर मूलभूत



## आषाढी वारीसाठी प्रशासन सज्ज

सुविधा वेळेत पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. कोणत्याही परिस्थितीत वारकऱ्यांना अडचणी येऊ नयेत, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

भंडीशेगाव येथील सोपानकाका महाराज पालखी तळाच्या विकासासाठी ५४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, सपाटीकरण, मुरमीकरण, पालखी कट्टा, हायमास्ट दिवे आदी कामे वेगाने सुरू आहेत. ही सर्व कामे पालखी सोहळा दाखल होण्यापूर्वी दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

तसेच पालखी कट्ट्यालगतची जुनी इमारत पाडण्याची कार्यवाही तातडीने करण्यास सांगितले. याशिवाय वाखरी पुलालगत मुरमीकरण करून उतार तयार करणे, पालखी तळाजवळ तात्पुरती ड्रेनेज व्यवस्था उभारणे व पावसामुळे पाणी साचणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सरगम चौक, वाखरी पूल व पालखी तळ, भंडीशेगाव येथील सोपानकाका महाराज पालखी तळ, ज्ञानेश्वर महाराज पालखी तळ, गुरसाळे आणि करकंब येथील पालखी तळ व मुक्कामाच्या ठिकाणांची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या

### खापरखेडा वासीयांना मोठा दिलासा; अखेर २५ MVA ट्रान्सफॉर्मर दाखल



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** महापारेषण कंपनीच्या ४०० घत उत्रछ खापरखेडा उपकेंद्रातील २५ चतअ क्षमतेचा मुख्य ट्रान्सफॉर्मर २२ जून रोजी अचानक निकामी झाला होता. त्यामुळे खापरखेडा परिसरात अचानक वीज संकट निर्माण झाले होते. यासंदर्भात आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी महापारेषण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याना तातडीने ट्रान्सफॉर्मर लावण्याचे व वीज पुरवठा सुरू करण्याचे आदेश दिले होते. अखेर कवलेवाडा गोंदिया येथून २५ MVK क्षमतेचा मुख्य पॉवर ट्रान्सफॉर्मर महापारेषण कंपनीच्या खापरखेडा उपकेंद्रात दाखल झाला असून लवकरच वीज पुरवठा सुरू होण्याची चिन्हे दिसू लागली आहे. मुख्य पॉवर ट्रान्सफॉर्मर निकामी झाल्यामुळे रोहणा, चनकापूर, सिल्लेवाडा, खापरखेडा, भानेगाव, पाटणसावंगी, पिपळा डाकबंगला, दहेगाव रंगारी. भानेगाव ओपन कास्ट कोळसा खाण आदी परिसरातील वीज पुरवठा खंडित होण्याची शक्यता बळावली होती. त्यामूळे महावितरणच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी उप्पलवाडी आणि भागीमाहिरी २२० घत उपकेंद्रातून तात्पुरत्या स्वरूपात वीज पुरवठा केला होता. मात्र, लोड वाढल्यास अंधारात बुडण्याची टांगती तलवार होती कवलेवाडा गोंदिया येथे मुख्य पॉवर ट्रान्सफ़ॉर्मर उपलब्ध होते. मात्र, रेल्वेमूळे मुख्य पॉवर ट्रान्सफ़ॉर्मर आणण्यास तांत्रिक अडचणी येत होत्या. सर्व प्रशासकीय मंजुरी मिळाल्या नंतर महापारेषण कंपनीच्या खापरखेडा उपकेंद्रात मुख्य पॉवर ट्रान्सफॉर्मर दाखल झाले आहे. ट्रान्सफॉर्मर बसवण्याचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. एका आठवड्यात वीज पुरवठा सुरळीत केला जाईल अशी माहिती महापारेषण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

### खापरखेडा पत्रकार संघाच्या पाठपुराव्याला यश; ५ महिन्यांनंतर कामावर पुनर्नियुक्ती

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** खापरखेडा वीज केंद्रातील स्टोन ग्रॅपल ड्रावा मशीन ऑपरेटर म्हणून कार्यरत असलेल्या कामगारांना अखेर न्याय मिळाला असून



तब्बल ५ महिन्यांनंतर त्यांना पुन्हा कामावर रुजू करण्यात आले आहे. या प्रकरणात खापरखेडा पत्रकार संघाने सातत्याने पाठपुरावा करत संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर सकारात्मक निर्णय घेत कामगारांना दिलासा देण्यात आला.कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा असल्याने पत्रकार संघाने विविध स्तरांवर निवेदने, चर्चा व पाठपुरावा करून कामगारांच्या न्याय्य मागणीला बळ दिले. अखेर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत संबंधित कामगारांना पुन्हा सेवेत सामावून घेतल्याने कामगार व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.या यशस्वी पाठपुराव्यानिमित्त खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष सुनील जालंदर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे पदाधिकारी, कामगार प्रतिनिधी व इतर मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी पत्रकार संघाने भविष्यातही सर्वसामान्य नागरिक, कामगार व अन्यायग्रस्तांच्या प्रश्नांसाठी निःपक्षपातीपणे आवाज उठवत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. कामगारांचा आवाज... आमची जबाबदारी! या भूमिकेला न्याय देत संघाने समाजहिताचे कार्य पुढेही सुरू ठेवण्याचा विश्वास व्यक्त केला.

### पूरग्रस्त दुरशेत खरोशी गावांमध्ये जीवनावश्यक अन्नधान्याचे वाटप

**अक्षराज : मितेश जाधव**



**दि.१६, पेण (रायगड) :** सामाजिक बांधिलकी जपत सर्वसमावेशक समाज हिताच्या कामात नेहमीच पुढाकार घेणाऱ्या सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या पेण मधील मावळ्यांनी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रमिक गोजमगुंडे आणि कार्याध्यक्ष समीर म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रतिष्ठानचे तालुका अध्यक्ष रोहित केणी यांच्या पुढाकाराने आज पेण तालुक्यातील दुरशेत आणि खरोशी या पूरग्रस्त भागात जाऊन त्यांना जीवनावश्यक असणाऱ्या अन्नधान्याचे साहित्य वाटप करून आपले समाजाप्रती असणारे कर्तव्य पार पाडले आहे.आठ दिवसांपूर्वी रायगड जिल्ह्यात पडलेल्या मुसळधार पावसात पेण तालुक्यातील अनेक गावांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्या पूरग्रस्त गावांमध्ये दुरशेत आणि खरोशी या गावांचा देखील समावेश होता. या गावांमधील जवळपास ७० टक्के नागरिकांच्या घरामध्ये पुराचे पाणी शिरून घरातील अनेक वस्तूंसह दैनंदिन जीवनासाठी लागणारे अन्नधान्याचे काही सामान देखील पुरामध्ये वाहून गेले तर अनेक प्रकारचे अन्नधान्य भिजल्यामुळे या नागरिकांचे अतोनात हाल झाले होते. या प्रकारानंतर शासनाचे पंचनामे सुरू असले तरी ते कधी पूर्ण होतील आणि त्यांना मदत कधी होईल याची साशंकता असल्याने सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या शेकडो मावळ्यांनी तालुक्यातील दुरशेत आणि खरोशी गावात जाऊन कांदे, बटाटे, तेल, मसाले, मीठ, तांदूळ, खोबरे, लसुण, हळद, डाळी आदी जेवणासाठी लागणाऱ्या जीवनावश्यक चीज वस्तूंचे वाटप करून समाजाप्रती आपले असणारे कर्तव्य पार पाडले. सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या मावळ्यांनी केलेल्या या अनमोल मदतीचे तालुक्यातील साऱ्याच नागरिकांकडून कौतुक तर होतच आहे, परंतु या दोनही गावातील नागरिकांनी प्रतिष्ठानने केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले आहेत.

### खारघर येथे शवदाहिनीचे लोकार्पण व प्राणी अंत्यसंस्कार केंद्र भूमिपूजन कार्यक्रम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, पनवेल :** महानगरपालिकेच्या वतीने खारघर सेक्टर-१४ येथील हिंदू स्मशानभूमीत उभारण्यात आलेल्या पर्यावरणपूरक शवदाहिनीचे लोकार्पण तसेच प्राणी अंत्यसंस्कार केंद्राच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम शुक्रवार, दि.१७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील असतील. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे तसेच रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याबरोबरच सर्व लोकप्रतिनिधी, पनवेल महानगरपालिकेचे सर्व सदस्य आणि विविध मान्यवर, या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी नागरिकांनी या लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.